## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

## कुलगुरुपदासाठी जाहिरात

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, हे महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठांपैकी एक असुन मराठवाडा विभागाच्या कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण यांच्या गरजा भागविण्यासाठी या विद्यापीठाची दिनांक १८ मे १९७२ रोजी स्थापना करण्यात आलेली आहे. मराठवाडा विभागामधील आठ जिल्हे हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. या विद्यापीठा अंतर्गत १२ घटक (कॉन्स्टीटयुएन्ट) व ४३ खाजगी-कृषी व संलग्न विद्याशाखेतील महाविद्यालये असून त्यांचे मार्फत विदयावाचस्पती पदवी सह पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. विद्यापीठाचे संशोधन कार्य १७ संशोधन केंद्रांमार्फत स्थानिक गरजा व संशोधनाची आवश्यकता विचारात घेऊन केले जाते.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम १९८३ मध्ये शासनाने केलेल्या तरतुदी प्रमाणे कुलगुरु पदावरील निवड प्रक्रिया पुर्णपणे पारदर्शक व वस्तुनिष्ठ असावी हा त्या मागील उद्देश आहे. कुलगुरु पदावर नियुक्त होणारी व्यक्ती ही प्रख्यात विद्वान असेल, विद्यापीठाला व्यावसायिक दृष्टया प्रगत बनविण्याचे नेतृत्व गुण आणि उत्तम प्रशासकीय क्षमता असणारी असेल, ज्याद्वारे ती विद्यापीठाला शैक्षणिक आणि व्यावसायिक दृष्टया सर्वोत्कृष्ट दर्जाचे केंद्र बनवेल.

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व कृषी विद्यापीठाचे कुलपती यांनी कुलगुरुंच्या पदासाठी विख्यात कृषीशास्त्रज्ञ/विदयाव्यासंगी व विद्यापीठास शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचे अत्युच्च केंद्र बनविण्यासाठी क्षमता व दृष्टी असलेल्या व मराठवाडा क्षेत्रातील कृषीविषयक संशोधनाच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीची शिफारस करण्याकरीता पुढील त्रिसदस्यीय शोध समिती स्थापित केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | **मा. न्यायमूर्ती श्रीमती मंजुळा चेल्लूर<br>निवृत्त मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई** | **अध्यक्षा** |
| 2 | **डॉ. त्रिलोचन महापात्र,<br>सचिव (डेयर), भारत सरकार व महानिदेशक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली** | **सदस्य** |
| 3 | **श्री. विजय कुमार** | **सदस्य** |

| | **अति. मुख्य सचिव, कृषी व पणन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई** | |
|---|---|---|

सदर शोध समिती, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम १९८३ व त्यात शासनाच्या दिनांक २१ जुलै २०१० ते ६ जुलै २०१५ पर्यंतच्या आदेशाअन्वये घोषित केलेल्या कुलगुरुपदासाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव यांची पुर्तता करणा-या आणि हे आव्हान स्वीकारण्यास इच्छुक भारतीय नागरिकत्व असलेल्या प्रख्यात कृषीशास्त्रज्ञ / शिक्षणतज्ञ व्यक्ति यांच्याकडून नामनिर्देशने/आवेदनपत्रे मागवित आहे. या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता, अपेक्षित अनुभव, इच्छित कौशल्ये आणि क्षमता इत्यादीबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) (www.vnmkv.ac.in) उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सदर पदासाठी इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यात अर्जाच्या चार प्रतिंसह (सॉफ्ट कॉपीसह) त्यांच्या उमेदवारीच्या पुष्ठ्यर्थ दोन पानी समर्थन, तसेच त्यांची विद्यापीठाच्या उत्कर्षाबाबत दूरदृष्टी आणि त्यांच्या कार्याशी परिचित असणा-या तीन प्रसिध्द व्यक्तींची नावे व त्यांची पत्रे यांसह स्वत:ची तपशीलवार माहित देऊन अर्ज करावेत. संस्था देखील वरील अर्हता प्राप्त योग्य असा उमेदवार नाम निर्देशित करु शकतात.

शोध समितीने डॉ. पी. जी. पाटील, संचालक, केंद्रीय कापूस प्रौद्योगिकी संशोधन संस्था (CIRCOT), भारतीय कृषि अनुसंधान परिषद, भारत सरकार, मुंबई यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

इच्छुक उमेदवारांनी अंतिम दिनांक १६-०४-२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोडल अधिका-याकडे नामनिर्देशने / आवेदन पत्रे खालील पत्यावर पाठवावीत.

**डॉ. पी.जी. पाटील**

**संचालक,**

**केंद्रीय कापूस प्रौदयोगिकी संशोधन संस्था,**

**एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.**

**दूरध्वनी क्रं. +९१-२२-२४१४६००२ (डायरेक्ट)**

**+९१-२२-२४१२७२७३/७६**

**फॅक्स क्रं. +९१-२२-२४१५७२३९**

**ई-मेल : nodalmkv@gmail.com**

मुदती नंतर प्राप्त होणा-या नामनिर्देशनांचा / आवेदनपत्रांचा विचार केला जाणार नाही. आवेदन पत्र सादर करताना पाकिटावर **"कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विदयापीठ, परभणी पदाकरिता अर्ज**" असे ठळकपणे नमुद करावे. शोध समितीला आवश्यकता भासल्यास निवडयोग्य उमेदवारांना त्यांच्याबरोबर वैयक्तिक पातळीवर विचार विनिमय करण्यासाठी आमंत्रित करण्यात येईल.

भारतातील एका अत्यंत प्रगतशील राज्यामध्ये कृषी शिक्षण, विस्तार व संशोधन या क्षेत्रातील नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी / राबविण्यासाठी शैक्षणिक प्रशासकांना ही एक सुसंधी आहे.

**अध्यक्षा, शोध समिती**

**दिनांक : १३ मार्च,** २०१८

**स्थळ : मुंबई**